प्रकरण ४ थे

# संशोधनाची रूपरेषा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.

-:: प्रकरण ४ थे. ::-

# संशोधनाची रूपरेषा.

४.१ संशोधनाची पध्दती.

४.२ नमुना निवड.

४.३ संशोधनाची साधने.

४.४ अभ्यासकाला आलेले अनुभव.

## -: प्रकरण ४ संशोधनाची रूपरेषा :-

" औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या केंद्राचा चिकित्सक अभ्यास " या विषयाचा अभ्यासाची पार्श्वभूमी समजावून घेऊन पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. "

४.१ संशोधनाची पध्दती :-

औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या केंद्राचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. कारण सर्वेक्षण पध्दतीमुळे वर्तमान परिस्थिती समजते. त्याच प्रमाणे संबंधित विषयास मार्गदर्शन करण्यासाठी व दोष निर्मुलनासाठी उपयोग होतो. अभ्यासकाला त्याच्या समस्येची उकल करण्याकरिता आवश्यक परिस्थिती समजून घेण्यासाठी सर्वेक्षण याचा उपयोग होतो. अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी आधारभूत असलेल्या वर्तमान परिस्थितीचे सत्य आकलन होते. प्रारंभिक सर्वेक्षणामुळे समस्येच्या निराकरणासाठी योग्य व उपयुक्त असलेल्या पध्दती सुचविल्या जातात. आवश्यक असलेली तुलनात्मक माहिती मिळते. म्हणून अभ्यासकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

"औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या केंद्रांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी प्रौढ शिक्षणाच्या उद्दिष्टांची माहिती संकलित केली व प्रौढ शिक्षण विभागाशी संबंधित असणारे प्रौढ , संघटक, पर्यवेक्षक, व प्रकल्प अधिकारी यांच्यासाठी नमुना म्हणून पाच पाच प्रश्नावल्या तयार केल्या. संघटक, पर्यवेक्षक यांना प्रश्नावल्या दिल्या पण त्या भरून मिळाल्या नाहीत आज देऊ उद्या देऊ म्हणत प्रथम माहिती मिळाली नाही. प्रौढाला लहान अक्षरातील मुलाखत प्रश्नावली वाचता आली नाही. या सर्वाच्या अडचणी लक्षात घेऊन नंतर पुन्हा प्रौढासाठी मोठया अक्षरातील मुलाखत प्रश्नावली (अनुसूचि) तयार केली. त्यांना लिहिता येते का ? वाचता येते का ? हे पहाण्यासाठी मोठया अक्षरात प्रश्नावली तयार केली. प्रौढ शिक्षण विभागात कार्य करणारे

अधिकारी वर्ग व पर्यवेक्षक यांच्यासाठी मुलाखत प्रश्नावल्या तयार केल्या. प्रौढ शिक्षण वर्गाची केंद्र जेथे चालतात तेथील गावांचे सर्वेक्षण केले. गावाच्या माहितीसाठी सर्वेक्षण प्रश्नावली तयार केली. मुलाखती द्वारा सर्वेक्षण केले.

४.२ नमुना निवड :-

औसा तालुक्यात १९८८-८९ व १९८९-९० या दोन वर्षात राष्ट्रीय प्रौढ शिक्षण या संबंधी तीन योजना राबविल्या जात होत्या व राबविल्या जात आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजना.

( Rural Functional Literacy Programme)

२) राज्य प्रौढ शिक्षण योजना.

( State Adult Education Programme) )

३) विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे चालणारी महाविद्यालयातील राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना.
(National Adult Education Programme)

अभ्यासकाने औसा तालुक्यातील या तीन योजने तर्फे चालणा-या ४० प्रौढ शिक्षण केंद्राची निवड केली. साधा यादृच्छिक नमुना या पध्दतीने निवड केली.

१) ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजना तर्फे चालणा-या १९८८ व १९८९-९० या दोन वर्षातील प्रौढांची निवड १० स्त्री केंद्र व १० पुरूष केंद्र यातून केली.

या प्रत्येक केंद्रातून एक वर्षासाठी दोन प्रौढ या प्रमाणे १९८८-८९ व ८९-९० या दोन वर्षासाठी प्रत्येकी दोन प्रौढ म्हणजे एक स्त्री केंद्रातून ४ स्त्री प्रौढ व एका पुरुष केंद्रातून ४ पुरूष प्रौढ निवडले. हजेरी पटावरील क्रमांक १० आणि २० अशी प्रत्येक केंद्रातील २ वर्षातील प्रौढाची निवड केली. अशा प्रकारे ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजना यातून एकून ४० स्त्री प्रौढ व ४० पुरूष प्रौढ असे एकून ८० प्रौढ निवडले.

२) राज्य प्रौढ शिक्षण योजना तर्फे चालणा-या १९८९-९० मधील ५ स्त्री केंद्रे व ५ पुरुष केंद्रे यातील २० प्रौढांची निवड हजेरीपटावरील क्रमांक १० आणि २० अशी प्रत्येक केंद्रातील केली. ही केंद्रे १-४-८९ पासून सुरु झाली होती त्यामुळे त्याच वर्षातील प्रौढ निवडले.

३) विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना द्वारे चालणा-या १९८८-८९ मधील ५ स्त्री केंद्रे व ५ पुरुष केंद्रे यातील २० प्रौढ प्रत्येक केंद्रातील दोन प्रौढ हजेरी पटावरील क्रमांक १० आणि २० घेउन निवडले. १९८९-९० मध्यें ही केंद्रे बंद आहेत.

या प्रमाणे एकून ४० केंद्रे आणि एकून १२० प्रौढ यांची निवड अभ्यासासाठी केली. प्रत्येक केंद्रावरील एक संघटक या प्रमाणे ४० संघटक व ४० संघटकाना सहाय्य करणारे १० पर्यवेक्षक व प्रकल्प अधिकारी निवडले.

## ४.३ संशोधनाची साधने :-

" औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या केंद्राचा चिकित्सक अभ्यास " या विषयाचा अभ्यास करण्यासाठी पुढील प्रमाणे साधने वापरली आहेत.

१) संघटकासाठी मुलाखत प्रश्नावली.

ब) पर्यवेक्षकासाठी मुलाखत प्रश्नावली.

क) प्रकल्प अधिकारी यांच्यासाठी मुलाखत प्रश्नावली.

ड) प्रौढांच्यासाठी मोठया अक्षरात मुलाखत प्रश्नावली (अनुसूची)

ई) गावांच्या माहितीसाठी सर्वेक्षण प्रश्नावली ही सर्व साधने परिशिष्टात जोडली आहेत. प्रत्येक साधनाचे सर्वसामान्यपणे खालील प्रमाणे भाग पाडण्यात आले.

अ) संघटकाच्या मुलाखत प्रश्नावलीचे स्वरुप .

१) संघटकाची ओळख.

२) कार्यक्रमात सहभागी होण्याचा उद्देश.

३) प्रशिक्षण.

४) केंद्राचे व्यवस्थापन .

५) मानधन.

६) केंद्र चालविताणाच्या अडचणी.

७) कोण कोणत्या बाबी का ? व कशा पध्दतीने शिकविल्या जातात, शिकविण्याच्या पध्दती.

८) रेकॉर्ड, व्यवस्थापन, नोंदी, वेगवेगळे उपक्रम, आकस्मित भेटी अहवाल.

९) प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची यशास्विता ( मूल्यमापन)

ब) पर्यवेक्षकांच्या मुलाखत प्रश्नावलीचे स्वरूप.

१) शिक्षण

२) अनुभव

३) प्रशिक्षण

४) प्रौढ शिक्षण योजना राबवितांना येणा-या अडचणी

५) मूल्यमापन.

६) सुधारणा.

क) प्रकल्प अधिका-यांच्या मुलाखत प्रश्नावलीचे स्वरूप.

१) शिक्षण

२) योजना प्रकार

३) प्रशिक्षण

४) साहित्य वितरण व्यवस्था.

५) केंद्राचा खर्च.

६) योजने बद्दलचे मत.

ड) प्रौढांच्या मुलाखत प्रश्नावलीचे स्वरूप प्रौढांच्यासाठी मोठया अक्षरात प्रश्नावली तयार केली. तिचे विभाग पुढील प्रमाणे.

१) प्रौढाची ओळख.

२) प्रौढ शिक्षण वर्गात प्रवेश घेण्याचा उद्देश.

३) प्रौढ शिक्षण वर्गात उपस्थित राहण्यास येणा-या अडचणी.

४) शैक्षणिक साहित्य.

५) शिक्षणाचा व्यवहारात उपयोग.

इ) निवडलेल्या केंद्राच्या गावच्या सर्वेक्षणासाठी प्रश्नावली गावची माहिती घेतांना खालील मुद्दे अभ्यासात घेतले.

१) लोकसंख्या.

२) शैक्षणिक सोयी.

३) आरोग्य सेवा.

४) ग्राम गौरव.

४.४ अभ्यासकालात आलेले अनुभव :-

प्रस्तुत प्रबंधाचे संशोधन पूर्ण करतांना निरनिराळे अनुभव आले ते खालील प्रमाणे आहेत.

१) प्रौढ शिक्षण केंद्रांचे वर्ग कोणकोणत्या ठिकाणी कुठे चालतात ही माहिती मिळविण्यासाठी अनेक अडचणी आल्या. प्रौढ शिक्षणाची केंद्रे औसा तालुक्यात कोणकोणत्या ठिकाणी आहेत ही माहिती मिळविण्यासाठी जिल्हा प्रौढ शिक्षण विभाग, लातूर येथील कार्यालयातील शासनाच्या अधिका-याकडून योग्य सहकार्य मिळाले नाही.

अभ्यासकाला जिल्हा समन्वयक व सल्लागार, राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना, जिल्हा लातूर यांच्या सहकार्याने जिल्हा प्रौढ शिक्षण कार्यालय लातूर येथून माहिती उपलब्ध झाली.

केंद्रांची संख्या, संघटकांची नामावली, गावांची नावे, ही आवश्यक ती माहिती लवकर उपलब्ध झाली नाही.

संघटकांची त्यांच्या केंद्रावर जाऊन भेट घेण्यासाठी अनेक वेळा केंद्रावर जावे लागले पण त्यांची भेट लवकर झाली नाही.

त्या संघटकांची भेट झाली त्यांनी प्रथम माहिती सांगण्यास सहकार्य दिले नाही. त्यांना मुलाखतीचा उद्देश सांगूनही लवकर माहिती देण्यास संघटक तयार झाले नाहीत.

ओळखीच्या संघटकांनी मुलाखतीचा उद्देश सांगितल्यावर माहिती दिली. बहुसंख्य संघटक ४ थी पास होते, त्यांनी माहिती देण्यांस नकार दिला त्यामुळे पर्यवेक्षकांच्याकडे मार्फत संघटकांच्याकडे जावून मुलाखत घ्यावी लागली.

पर्यवेक्षक व प्रकल्प अधिकारी यांची भेट लवकर झाली नाही त्यामुळे मुलाखत घेण्यास उशिर झाला.

१९८८-८९ मध्यें ज्या प्रौढांनी प्रौढ शिक्षण चा वर्ग ( अभ्यास ) पूर्ण केला. अशा प्रौढांना मोठया अक्षरातील प्रश्नावली देऊन वाचण्यास सांगितले. पण प्रथम ते वाचनास तयार झाले नाहीत. कांही प्रौढांनी आनंदाने जेवढे येते तेवढे वाचले व लिहिले.

प्रौढांच्या मुलाखत अनुसूची प्रश्नावलीतील सर्व माहिती प्रौढांना वाचता आली नाही, लिहिता आली नाही शक्य तेवढी माहिती त्यांच्याकडून भरून घेतली . जी माहिती त्यांना भरणे शक्य झाले नाही ती अभ्यासकाने प्रश्न विचारून भरली.

१९८९-९० मधील प्रौढांना मुलाखत प्रश्नावली दिली व वाचण्यास सांगितली, त्यांना अक्षर ओळख होती पण वाचता आले नाही. कारण त्यांच्या साक्षरतेचा वर्ग पूर्ण झालेला नव्हता त्यामुळे त्या वर्षातील प्रौढांची माहिती त्यांना प्रश्न विचारून नोंद केली.

प्रौढ स्त्रियांनी प्रौढ पुरुषा पेक्षा माहिती कमी दिली. त्यांच्यात लाजाळूपणा दिसून आला पण अभ्यासक ही स्त्री आहे. त्यांच्या पैकीच आहे हे ओळखून सहकार्याने माहिती दिली.

१0 टक्के संघटकांनी माहिती उत्साहाने दिली.